# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
## कोल्हापूर विभागीय मंडळ , कोल्हापूर
### ५३९,कसबा करवीर राजेंद्र नगर कोल्हापूर- ४१६ ००४

क्र. कोविमं/ १२ वी /प्रात्यक्षिक/८३८
कोल्हापूर - ४१६००४
दिनांक :- ०४/०७/२०२३

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यता प्राप्त कनिष्ठ महाविद्यालये,

**विषय :- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा जुलै / ऑगस्ट २०२३ शास्त्र व गणित (४०) विषयाच्या प्रात्यक्षिक परीक्षेच्या व्यवस्थेबाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा जुलै / ऑगस्ट २०२३ प्रात्यक्षिक परीक्षा १८ जुलै २०२३ ते ०५ऑगस्ट २०२३ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या आहेत. आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील गणित(४०), भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र व जीवशास्त्र या विषयास प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांची शास्त्र प्रात्यक्षिक परीक्षा खाली तक्त्यामध्ये नमूद केलेल्या आपल्या संबंधित तालुक्याच्यासमोर दर्शविलेल्या परीक्षा स्थळावर/ केंद्रावर निर्धारित केलेल्या वेळेत घेण्यात येईल. त्याप्रमाणे आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील उपरोक्त विषयांची ओएमआर गुणतक्ते संबंधित केंद्रांना देण्यात आलेली आहेत.

| अ.क्र. | समाविष्ट असणारी तालुके | प्रात्यक्षिक परीक्षा केंद्र कनिष्ठ महाविद्यालय |
|---|---|---|
| १. | कराड (०२) व पाटण (०९) | यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स, कराड ता.कराड जि. सातारा (२१.०२.००२) फोन नं. ०२१६४-२७१३५६ |
| २. | खंडाळा (०३), माण (०६) व फलटण (०८) | मुधोजी कॉलेज,फलटण ता.फलटण जि. सातारा (२१.०८.००१) फोन नं. ०२१६६- २२२३३० |
| ३. | जावळी (०१), कोरेगांव (०५), महाबळेश्वर (०७) व वाई (११) | यशवंतराव चव्हाण इन्स्टिटयुट ऑफ सायन्स, सातारा जि.सातारा (२१.१०.००३) फोन नं.०२१६२-२३४३९२/ २३७४०८ |
| ४. | खटाव (०४) व सातारा (१०) | लाल बहादूर शास्त्री कॉलेज, सातारा ता.जि. सातारा (२१.१०.००५) फोन नं. ०२१६२ - २३७९८६ |
| ५. | जत (०२), कवठेमहंकाळ (०४), मिरज (०६) व सांगली (०८) | विलिंग्डण महाविद्यालय, विश्रामबाग, जि. सांगली (२२.०८.००१) फोन नं.०२३३-३०२५१८०/३०२५१५४ |
| ६. | आटपाडी (०१), कडेगांव (०३), खानापूर (०५), पलूस (०७) व तासगांव (१०) | विद्यानिकेतन कृषी माध्यमिक विद्या. व ज्यु. कॉलेज ऑफ सायन्स & कॉमर्स, तासगांव जि.सांगली (२२.१०.००३) फोन नं. ०२३४६-२४०१३३ |
| ७. | शिराळा (०९), व वाळवा (११) | कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरूण इस्लामपूर ता. वाळवा जि. सांगली(२२.११.००१) फोन नं.०२३४२-२२१७७८ |
| ८. | आजरा (०१), चंदगड (०३), गडहिंग्लज (०४) व कागल (०७) | देवचंद कॉलेज, अर्जुननगर ता. कागल जि. कोल्हापूर (२३.०७.००१) फोन नं. ०८३३८-२२०११२ |
| ९. | हातकणंगले (०६), पन्हाळा (१०) व शिरोळ (१३) | विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर जि. कोल्हापूर(२३.०९.००२) फोन नं. ०२३१-२६५८६१२ |
| १०. | भुदरगड (०२), गगनबावडा (०५), करवीर (०८), कोल्हापूर (०९), राधानगरी (११), व शाहूवाडी (१२) | न्यू कॉलेज, कोल्हापूर जि. कोल्हापूर (२३.०९.००८) फोन नं. ०२३१-२६२११८७ |

पुर्नपरीक्षार्थी विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक / तोंडी परीक्षेस पुन्हा प्रविष्ठ व्हावे लागेल. विद्यार्थ्यांसाठी पूर्वीचे गुण ग्राहय धरण्यात येणार नाहीत. विद्यार्थ्यांना वरील कालावधीत उपरोक्त परीक्षा केंद्राशी संपर्क साधण्याच्या सूचना देण्यात याव्यात. तसेच **शास्त्र व गणित (४०) विषयाखेरीज अन्य अभ्यासक्रमाच्या विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षा ज्या त्या संबंधित कनिष्ठ महाविद्यालयामध्येच घेण्यात येतील याचीही नोंद घ्यावी.**

(पोवार डी.एस.)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.